## पिंपरी चिंचवड महानगरपालिका , पिंपरी - ४११ ०१८
## जाहिरात क्रमांक - २०४ /२००९

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आस्थापनेवर खालील संवर्गात **अपंग प्रवर्गातील अनुशेष** भरणेकामी खालील पदांसाठी नमुद केलेल्या प्रवर्गातील उमेदवारांकडुन सरळसेवा प्रवेशाने अर्ज मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | पदनाम | गट | वेतनश्रेणी | अपंगत्वाचा प्रकार | पद संख्या | एकुण पद संख्या | प्रवर्ग | शैक्षणिक अर्हता व अनुभव |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | प्लंबर (नळ कारागीर) | क | पे बँड र.रु. ५२००-२०२००० ग्रेड पे - २४०० | **अल्पदृष्टी (PS) Partially Sighted** | १ | १ | खुला | १) इ.७ वी उत्तीर्ण<br>२) शासनमान्य औद्योगिक प्रशिक्षण संस्थेकडील (आय.टी.आय.) प्लंबर कोर्स उत्तीर्ण असणे आवश्यक<br>३) प्लंबर या पदाचा २ वर्षाचा अनुभव आवश्यक तसे प्रमाणपत्र सोबत सादर करावे.<br>४) शासनाने विहित केलेली संगणक अर्हता १ वर्षाच्या आत उत्तीर्ण होणे आवश्यक राहील. |

**अटी व शर्ती -**

१) वरील पदांसाठी अर्ज करणा-या उमेदवारांचे जाहिरातीचे दिनांकास किमान वय १८ वर्षापेक्षा कमी व ४५ वर्षापेक्षा जास्त नसावे. वरील पदांसाठी अर्ज करणा-या उमेदवारांनी जाहिरातीच्या दिनांकास नमुद केलेली शैक्षणिक अर्हता धारण केलेली असणे आवश्यक राहील.

२) सोबत दिलेल्या विहित नमुन्यात ३० से.मी. x २० से.मी. आकाराच्या जाड पांढ-या कागदावर अर्ज करावा. प्रत्येक पदासाठी स्वतंत्र अर्ज करावा. त्यावर पासपोर्ट आकाराचा नव्याने काढलेला व स्वतःचा स्वाक्षरी असलेला फोटो लावावा.खुल्या प्रवर्गातील उमेदवारांनी र.रु.२००/- व मागासवर्गीय उमेदवारांनी र.रु.१००/- इतके परीक्षाशुल्क असलेला राष्ट्रीयकृत बँकेचा व मा.आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांचे नावे असणारा धनाकर्ष (डिमांड ड्राफ्ट) अर्जासोबत जोडावा. त्याकरीता मागास प्रवर्गातील उमेदवारांनी त्यांचे जातीचे वैधता प्रमाणपत्राची अथवा जातीचा दाखल्याची सत्यप्रत अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे. कोणत्याही परिस्थितीत सदर परीक्षा शुल्क परत केले जाणार नाही. परिक्षा शुल्कासाठीचा धनाकर्ष (Demand Draft) अर्जासोबत प्राप्त न झाल्यास अर्ज अपात्र करणेत येईल याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

३) अर्ज मा. आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८ यांच्या नावाने दि. २२/१२/२००९ पुर्वी पोहचतील अशा बेताने पोष्टाने पाठवावेत. कोणत्याही कारणास्तव वरील दिलेल्या मुदतीनंतर प्राप्त झालेल्या अर्जांचा विचार केला जाणार नाही.

४) अर्जासोबत शैक्षणिक अर्हता, वय, जातीचा दाखला, अपंगत्वाचा दाखला, इत्यादी प्रमाणपत्रांच्या साक्षांकित झेरॉक्स प्रती तसेच जात वैधता प्रमाणपत्र उपलब्ध असल्यास त्याची साक्षांकित प्रत अर्जासोबत जोडावी. जन्मतारखेसाठी शाळा सोडल्याचा दाखला / जन्मनोंदीचा दाखला यांची साक्षांकित प्रत जोडावी. साक्षांकित प्रती केंद्र / राज्य शासनाचे राजपत्रित अधिकारी, पोस्ट मास्तर, मुख्याध्यापक तसेच साक्षांकनाबाबत प्राधिकृत व सक्षम अधिका-यांनीच साक्षांकित केलेल्या असाव्यात. अर्जासोबत आवश्यक कागदपत्राच्या झेरॉक्स सत्यप्रती जोडलेल्या नसल्यास अर्ज अपात्र करण्यात येईल व त्याबाबत कोणताही पत्रव्यवहार करण्यात येणार नाही.

५) उमेदवाराची सेवायोजन कार्यालयाकडे नोंदणी असणे आवश्यक आहे. सदर नोंदणी कार्डाची सत्यप्रत अर्जासोबत जोडावी.

६) प्रमाणपत्राच्या मुळ प्रती (Original Certificate) अर्जासोबत जोडु नयेत.

७) निवड झालेल्या सर्व उमेदवारांना महाराष्ट्र शासन वित्त विभागाकडील शासन निर्णय क्र. अंनियो-१००५/सेवा-४, दि. ३१/१०/२००५ नुसार नवीन अंशदान निवृत्ती वेतन योजना म्हणजेच परिभाषित अंशदान निवृती योजना ( Defined contribution Pension System) लागु राहील.

८) शासकीय / निमशासकीय सेवेतील कर्मचारी यांनी त्यांचे अर्ज विहित मुदतीत त्यांचे कार्यालय प्रमुखांचे परवानगीने भरावेत व अशा परवानगीची प्रत अर्जासोबत जोडावी.

९) छाननीत पात्र ठरलेल्या उमेदवारांची आवश्यकतेनुसार लेखी व तोंडी परिक्षा घेण्यात येईल.

१०) उमेदवार ज्या राखीव जाती प्रवर्गाच्या पदासाठी अर्ज करीत असेल त्या जाती प्रवर्गाचे जातीचे प्रमाणपत्र त्याने अर्जासोबत जोडावे. उमेदवाराची अंतिम निवड झाल्यानंतर जात पडताळणी समितीचे वैधता प्रमाणपत्र सादर केल्याशिवाय त्यास नियुक्ती दिली जाणार नाही.

११) मुलाखतीस बोलविण्यात आलेल्या उमेदवारांना स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल.

१२) मुलाखतीस बोलविण्याचे अंतिम अधिकार मा.महापालिका आयुक्त यांनी राखुन ठेवले आहेत.

१३) अर्ज केला अथवा विहित अर्हता धारण केली म्हणजे परिक्षेस / मुलाखतीस बोलविण्याचा अथवा नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला आहे असे नाही. निवडीच्या कोणत्याही टप्यावर अर्जदार विहित अर्हता धारण करणारा न आढळल्यास, गैरवर्तन करताना आढळल्यास, दबाव तंत्राचा वापर करताना आढळल्यास उमेदवारी आपोआप रद्द होईल तसेच नियुक्ती झाली असल्यास कोणतीही पुर्व सुचना न देता त्यांची नियुक्ती समाप्त करण्यात येईल.

१४) महाराष्ट्र शासनाकडील आदेश क्र. एस.आर.व्ही -२०००/प्रक्र१७/२०००/१२,दि. ०१/०७/२००५ अन्वये वाढत्या लोकसंख्येला आळा घालण्याच्या दृष्टीने दि. २८/०३/२००६ व तद्नंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या २ पेक्षा अधिक असल्यास संबधित उमेदवाराचा नेमणुकीसाठी विचार करण्यात येणार नाही व तसे प्रतिज्ञापत्र विहित नमुन्यात संबधित उमेदवाराने महापालिका सेवेत रुजु होताना सादर करणे आवश्यक राहील.

१५) उमेदवाराचे अपंगत्व किमान ४० % असणे आवश्यक आहे व त्यासंबधीचे जिल्हा शल्य चिकित्सक/केंद्र/राज्यशासनाने यासाठी स्थापन केलेली मंडळे यांचेकडील अपंगत्वाचे प्रमाणपत्राची सत्यप्रत अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

१६) **उमेदवार निवडीची पध्दत -**
महापालिकेस प्राप्त झालेल्या अर्जाची छाननी करुन पात्र ठरलेल्या उमेदवारांना परिक्षेची पत्रे पोष्टाने पाठविण्यात येतील. तसेच परिक्षेची व्यवस्था, परिक्षा केंद्र इ. बाबतचा तपशिल पत्राने कळविण्यात येईल तसेच महापालिकेच्या www.pcmcindia.gov.in या संकेतस्थळावर पाहता येईल. परिक्षेमध्ये गुणानुक्रमे पात्र ठरणा-या उमेदवारांना मौखिक मुलाखतीची पत्रे परीक्षेचा निकाल जाहीर होताच समक्ष देण्यात येतील. तसेच महापालिकेच्या संकेतस्थळावर पाहता येईल. परिक्षा व मौखिक मुलाखतीमध्ये गुणानुक्रमे पात्र ठरणा-या उमेदवारांची निवडयादी व प्रतिक्षायादी महापालिकेच्या नोटीसबोर्डवर व वेबसाईटवर पाहण्यासाठी उपलब्ध करुन देण्यात येईल.

१७) टपाल खात्यामुळे झालेल्या कोणत्याही विलंबास अथवा टपाल गहाळ झाल्यास महापालिका जबाबदार राहणार नाही.

१८) जाहिरातीच्या अनुषंगाने अधिकृत अर्जाचा नमुना महापालिकेच्या www.pcmcindia.gov.in या संकेतस्थळावरुन Download करुन घेता येईल.

सही/-
(आशीष शर्मा)
आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी ४११ ०१८

क्रमांक - प्रशा/२/कावि/१७३९./२००९
दिनांक - ०७/१२/२००९

सहा.आयुक्त (प्रशासन)
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी ४११०१८

=[

# उमेदवाराने करावयाच्या अर्जाचा नमुना

| **उमेदवाराचे पासपोर्ट आकाराचे छायाचित्र** |
|---|

प्रति,
मा. आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी ४११ ०१८

**विषय** :- --------------------- **पदासाठी अर्ज**

**संदर्भ :-** दिनांक /१२/२००९ रोजीच्या ________________ या
वर्तमानपत्रात प्रसिद्ध झालेली जाहिरात क्रमांक - २०४/२००९

महोदय,

संदर्भिय जाहिरातीनुसार मी सरळसेवा प्रवेशाने ________________ पदासाठी आवश्यक ती अर्हता धारण करीत असून या पदासाठी निवड होण्याकरीता विहीत नमुन्यातील अर्ज सादर करीत आहे.

आडनाव स्वतःचे नाव वडील / पतीचे नाव

१) संपूर्ण नाव :- ________________

२) पत्रव्यवहाराचा पत्ता :- ________________

________________

३) जन्मतारीख :-

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | १ | ९ | | |

४) लिंग - पुरुष स्त्री

५) जात :- ________________

खालीलपैकी लागू असलेल्या प्रवर्गाखालील चौकटीत ✓ अशी खुण करावी.

| अनु. जाती | अनु. जमाती | वि.जा. (अ) | भ.ज. (ब) | भ.ज. (क) | भज (ड) | विमाप्र | इमाव | खुला |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | |

६) सेवायोजन कार्यालय/समाज कल्याण/एकात्मिक अदिवासी विकास प्रकल्प आदिंकडे नोंदणी केलेली असल्यास नोंदणी क्रमांक व दिनांक - ----------------------------

७) खालील प्रमाणे अंपग प्रवर्गात मोडत असल्यास योग्य ती माहिती भरावी

| अपंगत्वाचा प्रकार | अपंगत्वाची टक्केवारी |
|---|---|
| अल्पदृष्टी (PS) Partially Sighted | |

८) अर्जदाराने धारण केलेल्या शैक्षणिक अर्हतेचा तपशिल :-

| **अ. क्र.** | **शैक्षणिक अर्हता** | **उत्तीर्ण वर्ष** | **मिळालेले एकूण गुण** | **टक्केवारी** |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

९)  तांत्रिक पात्रता  - ____________________

१०)  अनुभव :- ____________________
____________________

११) परिक्षा शुल्क धनाकर्ष ( Demand Draft) क्र.                    , दि.     /     /२००९
र.रु.                          बँकेचे नाव  -

वर नमुद केलेला तपशिल खरा व बरोबर असून त्याबाबत आवश्यक प्रमाणपत्राच्या प्रमाणीत प्रती सोबत जोडत आहे. मी असेही प्रमाणीत करतो / करते  की, वर दिलेली माहिती खोटी अगर चूकीची आढळून आल्यास या माहितीच्या आधारे नोकरी वरुन कमी करण्यास मी पात्र राहीन, तसेच माझ्याविरुध्द कायदेशीर कारवाई केल्यास माझी कोणतीही तक्रार राहणार नाही.

स्थळ   :
दिनांक :

अर्जदाराची सही

सहपत्रे : १)

२)